# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२५ (              ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने विद्यापीठ परिक्षेत्रातील जळगाव, धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील  विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळेत प्रवेशीत १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांचा अपघात विमा उतविण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध अर्थसहाय्याच्या योजना राबविल्या जातात त्याचाच एक भाग म्हणून मागील वर्षापर्यंत विद्यार्थ्याचा दुर्देवाने अपघात होऊन मृत्यू झाल्यास कुटुंबाच्या वारसाना २ लाख ४० हजार रूपये व कुलगुरु वैद्यकिय निधी योजनेतून १० हजार रूपये आर्थिक मदत केली जात होती.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यार्थ्याचा दुर्देवाने अपघात होऊन मृत्यू झाल्यास कुटुंबाच्या वारसाना ५ लाख रूपये व कुलगुरु वैद्यकिय निधी योजनेतून १० हजार रूपये आर्थिक मदत केली जाणार आहे.

याबाबतचा दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी व विद्यापीठ यांच्यात करार करण्यात आला आहे.  दि न्यु इंडिया इन्शुरन्सचे विभागीय व्यवस्थापक एस.डी.कमलाकर, सहाय्यक प्रबंधक, पंकज सोनी, एजंट, प्रल्हाद पाटील यांना विमा उतरविण्यासाठीच्या हप्त्याची रक्कम २४ लाख ९७ हजार चाळीस रूपयांचा धनादेश कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी कुलसचिव भ.भा.पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सत्यजित साळवे, सहायक कुलसचिव, एन.जी.पाटील आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-विवि/हस्तदेय/२०१९                दि.१५ जुलै,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमीस प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रमोद आ.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारीयांच्या करीता